ePaper
डोनाल्ड ट्रम्प यांना कोर्टाचा झटका! राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास बंदी!



| वर्ष - 7 | अंक - 222 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पॅट कमिन्सने इतिहास रचला!
- अनुष्का शर्माची खास पोस्ट
- ८० लाख लोकांच्या नोकऱ्या जाणार
- अधिवेशन बोलावून आरक्षण देणार!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 20 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी ते निगडी मेट्रो 'सुसाट'!

## निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु : तीन वर्षात होणार काम पूर्ण!

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**पुणे मेट्रोच्या पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या विस्तारित मार्गिकेची निविदा प्रक्रिया सुरु झाली आहे. पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील मार्गिका 1 आणि मार्गिका 2 मिळून एकूण 24 किमी मार्गावर प्रवासी सेवा सुरु झाली आहे. उर्वरित 9 किमी मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून लवकरच पुणे मेट्रोची पहिल्या टप्प्यातील संपूर्ण मार्गिका प्रवाशांसाठी खुली करण्यात येणार आहे. पुणे मेट्रोतील स्वारगेट ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका या मार्गिका 1 मधील प्रवाश्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी (भक्तीशक्ती चौक) या मार्गाच्या विस्तारीकरणाची निविदा महामेट्रोने शनिवारी प्रसिद्ध केली आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते निगडी (भक्तीशक्ती चौक) या विस्तारित मार्गाला केंद्र सरकारने 23 ऑक्टोबर 2023 रोजी मान्यता दिली. या मार्गाची एकूण लांबी 4.519 किमी असून या मार्गिकेचा एकूण खर्च 910.18 कोटी इतका आहे. या मार्गाच्या व्हायाडक्तच्या कामाची निविदा प्रकाशित झाली आहे. या संपूर्ण विस्तारित मार्गाचे काम 3 वर्षे आणि 3 महिन्यात पूर्ण करण्याचे महामेट्रोचे नियोजन आहे. या मार्गिकेचे बांधकाम स्वीकृती पत्र मिळाल्यापासून 130 आठवड्यात पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे.



> "या विस्तारित मार्गिकेमुळे चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्तीशक्ती चौक हे विभाग मेट्रो नेटवर्कला जोडले जाणार आहेत. यामुळे त्या भागातील राहणाऱ्या हजारो नागरिकांना (METRO) त्याचा आहे.
> - **श्रावण हर्डीकर,** महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक



हा संपूर्ण मार्ग उन्नत असून या मार्गावर चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्तीशक्ती चौक ही 4 स्थानके असणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थानक ते चिंचवड स्थानकातील अंतर 1.463 किमी, चिंचवड स्थानक ते आकुर्डी स्थानकातील अंतर 1.651 किमी, आकुर्डी स्थानक ते निगडी स्थानकातील अंतर 1.62 किमी आणि निगडी स्थानक ते भक्ती शक्ती चौक स्थानकातील अंतर 975 मीटर असणार आहे.

संबंधित निविदेची माहिती पुणे मेट्रोच्या WWW.PUNEMETRORAIL.COM या अधिकृत संकेतस्थळाला अथवा HTTPS://EPROCURE.GOV.IN या सीपीपी संकेत स्थळाला भेट देऊन मिळवू शकता. हे जलद गतीने पूर्ण होण्यासाठी व्हायाडक्त बांधण्याबरोबरच ठेकेदाराला स्थानकाचे कोनकोर्स व फलाटाच्या स्लॅबचे काम करावे लागणार आहे. यामुळे स्थानकाच्या बांधणीचा वेळ वाचणार आहे. अश्याप्रकारचे नियोजन महामेट्रोमध्ये राबविण्यात येत आहे.

# औद्योगिक ग्राहकांच्या तत्पर ग्राहक सेवेसाठी महावितरण कटिबद्ध

## पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांची माहिती

**| पिंपरी चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

**विकासाला हातभार लावणाऱ्या औद्योगिक ग्राहकांच्या तत्पर सेवेसाठी महावितरण कटिबद्ध आहे. या ग्राहकांसाठी पुणे परिमंडल अंतर्गत एमआयडीसी विद्युत सुधारणा योजनेअंतर्गत विविध एमआयडीसीमध्ये 44 कोटी 70 लाख रुपये खर्चाचे विद्युत विषयक कामे सध्या सुरु आहेत. यातील चाकण एमआयडीसीमधील दोन स्विचिंग स्टेशन्स कार्यान्वित झाल्यामुळे प्रामुख्याने औद्योगिकसह घरगुती व वाणिज्यिक 3 हजार 850 ग्राहकांना आणखी दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी दिली**

विद्युत यंत्रणा सुधारणा योजनेअंतर्गत चाकण एमआयडीसीमध्ये 15 कोटी 49 लाख रुपये खर्चाच्या मंजूर आराखड्यातील किंग्फा 22/22 केव्ही स्विचिंग स्टेशन व ह्युंदाई 22/22 केव्ही स्विचिंग स्टेशन सोमवारी (दि. 18 ) कार्यान्वित करण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता श्री. पवार बोलत होते. अधीक्षक अभियंता युवराज जरग, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे अध्यक्ष दिलीप बटवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजेंद्र पवार म्हणाले, कार्यान्वित झालेल्या दोन स्विचिंग स्टेशनमुळे अतिभारित होत असलेल्या 22 केव्ही क्षमतेच्या नऊ वीजवाहिन्यांचे विभाजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रामुख्याने उच्च व लघुदाबाच्या 1350 औद्योगिक ग्राहकांसह परिसरातील सुमारे 2 हजार 500 घरगुती व वाणिज्यिक ग्राहकांना आणखी दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा होणार आहे. औद्योगिक ग्राहकांसाठी दर्जेदार सेवा देण्यासाठी विद्युत यंत्रणा सुधारणा योजनेअंतर्गत चाकण एमआयडीसीमध्ये 15 कोटी 49 लाख तर पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील रामटेकडी, आकुर्डी, भोसरी, तळवडे व हिंजवडी एमआयडीसीमध्ये एकूण 29 कोटी 21 लाख रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला असून त्यातील विविध कामांना सुरुवात करण्यात आली आहे.

### उच्चदाब वीजवाहिन्यांचे अपग्रेडेशन

**यासोबतच चाकण एमआयडीसीमध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजनेतून (आरडीएसएस) तीन नवीन उपकेंद्र व 2 स्विचिंग स्टेशन्ससह 94कोटी 30 लाख रुपये खर्चाचे विविध कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेतून म्हाडा, भांबोली, वाकी येथे 33 /22 केव्हीचे नवीन उपकेंद्र, कुरूळी व चाकण येथे 22 /22 चे स्विचिंग स्टेशन तसेच 65 किलोमीटर भूमिगत व उपरी वीजवाहिन्यांचे विभाजन, 40 रिंग मेन युनिट, 83 नवीन वितरण रोहित्रे, 90 वितरण रोहित्रांची क्षमतावाढ, 85 किलोमीटर उच्चदाब वीजवाहिन्यांचे अपग्रेडेशन आदी कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.**

# पीएमआरडीए गृहप्रकल्पात दिरंगाई!

## मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली विधिमंडळात कबुली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) वाल्हेकरवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पामध्ये दिरंगाई झाली आहे. खासगी विकसकाला चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. प्रकल्पाचे काम अपूर्ण असतानाही विलंबामुळे वसूल करण्यात आलेल्या दंडातील रकमेतही सवलत देण्यात आली असल्याची कबुली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिमंडळात दिली.**



पीएमआरडीएकडून चिंचवड येथील वाल्हेकरवाडी परिसरात आर्थिक दुर्बल आणि कमी उत्पन्न गटातील घटकांसाठी सन २०१६ पासून ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला चार वेळा मुदवाढ देऊनही अद्याप प्रकल्प पूर्ण नसून भाववाढीच्या नावाखाली प्रकल्पाची किंमत वाढवून मागणी होत आहे. संबंधिताकडून दिरंगाईचा वसूल केलेला दंडदेखील माफ करण्यात आला आहे. चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पीएमआरडीएच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया मागवून संबंधित प्रकल्प सन २०१६ मध्ये एका खासगी कंपनीला ४२ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आला होता. मात्र, सन २०१९ मध्ये करोना प्रादूर्भाव, टाळेबंदी, बांधकाम साहित्य, मजूर इत्यादींची कमतरता तसेच प्रकल्पाच्या काही भागात काही मिळकतधारकांनी केलेले अतिक्रमण आदी कारणांमुळे गृहप्रकल्पाचे काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यास कंत्राटदाराला अडचणी आल्या. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. मात्र निविदेतील अटी शर्तीनुसार देय भाववाढ गोठवून एक कोटी ६१ लाख रुपये दंड आकारण्यात आला. मधल्या काळात बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालात झालेली भाववाढ, वाढती महागाईमुळे भाववाढ मिळण्याबाबत कंत्राटदाराने कार्यालयाकडे विनंत केली होती. त्यानुसार कामाची गती पाहता कंत्राटदाराला करोना प्रादुर्भाव आणि इतर विचार लक्षात घेऊन ५८.७० लाख रुपये दंडाची रक्कम परत केली गेली. तसेच भाववाढ निर्देशांकानुसार १६ कोटी कंत्राटदारास पीएमआरडीएने अदा केले आहेत. कंत्राटदाराने वसूल दंडातील उर्वरित रक्कम आणि भाववाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे, मात्र पीएमआरडीएने त्याला मान्यता दिलेली नाही. प्रकल्पात पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा आदी अपूर्ण सुविधा पूर्ण करून डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत लाभार्थ्यांना ताबा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. पीएमआरडीएकडून चिंचवड येथील वाल्हेकरवाडी परिसरात आर्थिक दुर्बल आणि कमी उत्पन्न गटातील घटकांसाठी सन २०१६ पासून ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला चार वेळा मुदवाढ देऊनही अद्याप प्रकल्प पूर्ण नसून भाववाढीच्या नावाखाली प्रकल्पाची किंमत वाढवून मागणी होत आहे. संबंधिताकडून दिरंगाईचा वसूल केलेला दंडदेखील माफ करण्यात आला आहे. चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

### भाववाढ मिळण्याबाबत विनंत

» पीएमआरडीएच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया मागवून संबंधित प्रकल्प सन २०१६ मध्ये एका खासगी कंपनीला ४२ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आला होता. मात्र, सन २०१९ मध्ये करोना प्रादूर्भाव, टाळेबंदी, बांधकाम साहित्य, मजूर इत्यादींची कमतरता तसेच प्रकल्पाच्या काही भागात काही मिळकतधारकांनी केलेले अतिक्रमण आदी कारणांमुळे गृहप्रकल्पाचे काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यास कंत्राटदाराला अडचणी आल्या. मात्र निविदेतील अटी शर्तीनुसार देय भाववाढ गोठवून एक कोटी ६१ लाख रुपये दंड आकारण्यात आला. मधल्या काळात बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालात झालेली भाववाढ, वाढती महागाईमुळे भाववाढ मिळण्याबाबत कंत्राटदाराने कार्यालयाकडे विनंत केली होती.

# निवडणूक कामासाठी २४ तासांत हजर व्हा!

## अन्यथा गुन्हे दाखल करू : विभागीय आयुक्त

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. दोनवेळा नोटीस बजावूनही त्याला साधे उत्तरही देण्यात आलेले नाही, अशा ५४२ जणांनी पुढील २४ तासांत निवडणूक कामासाठी हजर न झाल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी मंगळवारी दिला.**

हे ५४२ अधिकारी, कर्मचारी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकांमधील आहेत. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच लोकसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त राव यांनी मंगळवारी जिल्हा निवडणूक शाखेच्या कामकाजाचा आढावा घेतला. या बैठकीत पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि इतर शासकीय खात्यांमधील ५४२ अधिकारी, कर्मचाऱ्यांची 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी' (बीएलओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत वारंवार पत्र, नोटीस पाठविण्यात आली. मात्र, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून साधे



उत्तरही प्राप्त झालेले नाही, असे सांगण्यात आले. त्यावर पुढील २४ तासांत संबंधित कर्मचारी निवडणूक कामासाठी हजर न झाल्यास संबंधितांवर लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, असे आदेश विभागीय आयुक्त राव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. याबाबत बोलताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर म्हणाल्या, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार यादी अद्ययावतीकरण, मतदार नोंदणी, मतदान केंद्र तेथील सुविधा, मतदार यंत्र निश्चिती आदींचे नियोजन करण्यात येत आहे. अद्ययावतीकरण करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ असे चार लोकसभा मतदारसंघ असून त्यासाठी २१ विधानसभा मतदारसंघनिहाय ८२१३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर एक बीएलओ नियुक्त करण्यात येतो. यासाठी प्रामुख्याने महापालिकेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, लिपिक यांची बीएलओ म्हणून नेमणूक केली जाते. वारंवार पत्र, नोटीस बजावूनही अद्याप ५४२ कर्मचारी निवडणूक कामासाठी हजर झालेले नाहीत. विभागीय आयुक्त यांनी २४ तासांत हजर न झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

> " आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक शाखेने केलेल्या कामावर विभागीय आयुक्त राव यांनी समाधान व्यक्त केले. मतदारयादीतील नाव वगळण्यापूर्वी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्यात. तसेच मतदार नोंदणीसाठी प्राप्त सर्व अर्जांवर कार्यवाही करावी, असे आदेश दिले.
>
> – **मिनल कळसकर,** उपजिल्हा निवडणूक अधिकारी

# पिंपरी-चिंचवडमधील भूसंपादन प्रक्रियेला मिळणार गती!

## आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी : कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांचे सकारात्मक उत्तर

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील प्रलंबित भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित विभागाचे अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली जाईल, तसेच, भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिले.**




नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील भूसंपादन प्रक्रिया आणि आरक्षणांचा विकास या मुद्यावर आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधीद्वारे सभागृहाचे लक्ष वेधले. भूसंपादन प्रक्रियेतील दिरंगाई आणि नागरिकांना होणारा त्रास याबाबत लांडगे यांनी आक्रमक भूमिका मांडली.

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेची १९९७ मध्ये हद्दवाढ करण्यात आली. शहरात सुमारे २५ लाख १२ हजार वाहने आहेत. दरवर्षी दीड लाख नवीन वाहनांची भर पडते. मात्र, त्या तुलनेत शहरातील पायाभूत सोयी-सुविधा अपुऱ्या पडतात. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया सुलभ आणि गतीमान करण्याची आवश्यकता आहे.

तसेच, शहरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी नवीन रस्त्यांसाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. त्यासाठी भूसंपादन करीता आयुक्त- जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका झाल्या आहेत. परंतु, काही रस्त्यांसाठी १४-१४ वर्षे भूसंपादन झालेले नाही. गेल्या दोन महिन्यात चार अपघात झाले. त्यामुळे लोकांचा नाहक बळी गेला, असा संतापही लांडगे यांनी व्यक्त केला.

> महापालिका हद्दीत भोसरी विधानसभेतील समाविष्ट झालेल्या गावांमध्ये आम्ही चिखली-तळवडे- कुदळवाडी या परिसरात सात नवीन रस्ते हाती घेतले आहे. विविध आरक्षणांचा विकास करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. मात्र, भूसंपादन प्रक्रिया किचकट आणि वेळखाऊ अडचणी निर्माण होत आहेत. याबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे. शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आगामी काळात भूसंपादन प्रक्रियेला गती मिळेल, अशी अपेक्षा आहे. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये रस्त्याचे जाळे निर्माण करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### भूसंपादनासाठी कालबद्ध नियोजन हवे : आ. लांडगे

२००८ –०९ मध्ये समाविष्ट गावांचा विकास आराखडा मंजुर झाला. त्यावर कार्यवाही करण्यासाठी २०१७ पर्यंत वाट पहावी लागली. कारण, महापालिका प्रशासनाकडे आरक्षणाच्या जागा ताब्यात नाहीत. महापालिका प्रशासनाने शिबीर लावले. त्यामध्ये केवळ २० टक्के जागा ताब्यात आल्या आहेत. मात्र, त्याचे निविदा काढता येत नाही. देहू-आळंदी, आळंदी- पंढरपूर, पुणे-नाशिक रस्ता असे अनेक रस्ते भूसंपादनाअभावी प्रलंबित आहेत. राज्य शासनाने भूसंपादनासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

# इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला तत्काळ मान्यता द्या!

## खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्र सरकारकडे मागणी; गजेंद्रसिंह शेखावत यांना निवेदन

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणा-या इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन आणि संवर्धनाचा प्रकल्प राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठविला आहे. जल मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे हा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला तातडीने मान्यता देण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. याबाबत केंद्रीय नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन, जलशक्ती मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना निवेदन दिले आहे.**



त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, देहू व आळंदी ही महत्त्वाची तीर्थक्षेत्रे इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेली आहेत. इंद्रायणी नदीत घरगुती आणि औद्योगिक सांडपाणी, मैला सोडल्यामुळे नदी प्रदूषित झाली आहे. देहू व आळंदी या तीर्थक्षेत्रांमुळे इंद्रायणी नदीला विशेष महत्त्व आहे.

वारकऱ्यांसाठी ही नदी आस्थेची बाब आहे. गेल्या काही वर्षांत विविध कारणांनी इंद्रायणी नदीचे पात्र प्रदूषित झाले. त्यामुळे नदी सुधार प्रकल्प तयार करण्यात आला. यात नदी पात्र स्वच्छ करणे व शुद्धीकरण करण्यासाठी उपाय योजना सुचविणे. नदी काठावरील मुख्य ठिकाणी रिव्हरफ्रंट्स विकसित करण्याची योजना तयार करणे.

नदीत जलवाहतूक प्रणाली पुरविण्याच्या व्यवहार्यतेचे मूल्यांकन करणे, तसेच आवश्यक असल्यास दरवाजाची व्यवस्था करण्याच्या तरतुदींसह जलवाहतूक प्रस्तावित करणे. पूर्व सुसाध्यता अहवाल तयार करणे, मास्टर प्लॅन आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे.

> महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) ने 577.16 कोटी रकमेचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल बनविला आहे. हा प्रस्ताव राज्य शासनाने स्वीकारला आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. जल मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे असलेल्या या प्रस्तावाला तत्काळ मान्यता देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली. केंद्र शासन सकारात्मक असून लवकरच मान्यता मिळेल. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार**

या प्रकल्पाअंतर्गत इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरावरील एकूण 54 गावे व शहरांतील सांडपाणी प्रक्रिया करून नदी प्रदूषण नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने नियोजन करताना विचारात घेतलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने लोणावळा, तळेगाव दाभाडे व आळंदी या तीन नगरपरिषदा, वडगाव व देहू या दोन नगरपंचायती, देहू कॅन्टोन्मेंट बोर्ड, 15 हजारापेक्षा जास्त लोकसंख्येच्या तीन ग्रामपंचायती व इतर 46 ग्रामपंचायती यांचा समावेश आहे.




**भारताचे संविधान भारतातील सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य देते. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय निश्चित करताना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि बंधुता जपली जावी, असे स्पष्ट करते. राष्ट्रीय आंदोलनातील नेतृत्वाने शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ परिसरांकडे वैचारिक विर्मश, समीक्षात्मक चिंतन आणि वाद-प्रतिवाद-संवादाचे प्रमुख केंद्र म्हणून पाहिले.**

# विरोधी विचारांचे विद्यार्थी देशद्रोही




सदृढ लोकशाही घडविणारे केंद्र म्हणूनच विद्यापीठांकडे पाहिले जात असे. विद्यापीठांच्या उद्देशासंदर्भात टिप्पणी करताना पंडित जवाहरलाल नेहरूंनी लिहिले होते "विद्यापीठांचा उद्देश मानवता, सहनशीलता, तर्कशीलता, चिंतन-प्रक्रिया आणि सत्याचा शोध घेण्याची वृत्ती दृढ करणे हा असतो. त्यांचा उद्देश मानवसमाजाला निरंतर महान लक्ष्यासाठी प्रेरित करणे हा असतो. विद्यापीठांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडले तर ते देशासाठी व समाजासाठी फायदेशीर ठरेल". परंतु गेल्या काही वर्षांपासून विद्यापीठ परिसरांतही थोड्याफार प्रमाणातच शिल्लक राहिलेले वाद, प्रतिवाद व संवादाचे स्वातंत्र्य फॅसिस्ट शक्तींकडून हिरावून घेतले जात आहे. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेणे एकूणच भारतीय समाजाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कासाठी व विद्यार्थ्यांमधील वाद, प्रतिवाद व संवादाच्या वृत्तीची जोपासना करण्यासाठी इंग्लंडमधील २४ कुलगुरूंनी २०१६ मध्ये 'लंडन टाइम्स'मध्ये सामूहिक आवाहन प्रसिद्ध केले, "विद्यापीठ हे मुक्त विचारांची गंगोत्री असते. ती तशीच राहायला हवी.

तिथे कोणत्याही युक्तिवादाचा प्रतिवाद युक्तिवादानेच व्हायला हवा. तो करताना विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण वा सुडाची भीती असणार नाही, याची हमी द्यायला हवी. या अशा वैचारिक मुक्ततेस विरोध करणाऱ्यांनाही विचाराने आणि युक्तिवादानेच उघडे पाडावयास हवे. वैचारिक बंधने आम्हाला मंजूर नाहीत. आज उथळ राष्ट्रवादाच्या तंद्रीत भारतीय समाजमन दृष्टीहीन झाले आहे. ज्यांच्याकडे थोड्याफार प्रमाणात दृष्टी शिल्लक आहे त्यांचा आवाज चिरडून त्यांना 'देशद्रोही', 'नक्षलवादी', 'टुकडे-टुकडे गँग' वा 'जिहादी' घोषित केले जात आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणांसंदर्भात आवाज उठविणारे, सामाजिक, आर्थिक समानतेसाठी आग्रही असणारे आवाज व्यवस्थेच्या नजरेत 'देशविरोधी' किंवा 'देशद्रोही' ठरू लागले आहेत. विद्यापीठ परिसरातील आवाजांना बदनाम करण्याची सीमा ओलांडली गेली आहे. जवाहलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थ्यांना 'देशद्रोही' व विद्यापीठाला देशद्रोही व्यक्ती निर्माण करणारे यंत्र म्हणण्यापर्यंत येथील यंत्रणेची मजल गेली आहे. आपल्या विरोधात उठणाऱ्या प्रत्येक आवाजाला येथील राजकीय व्यवस्था आपल्या ट्रोल आर्मीद्वारे बदनाम करत आहे. आजच्या राजकीय व्यवस्थेला फक्त कारकूनी व व्यवस्थानुकूल शिक्षणव्यवस्था निर्माण करावयाची असून विद्यार्थ्यांना राजकीय व सामाजिक प्रश्नांपासून दूर हेतुपरस्पर ठेवले जात आहे. विद्यार्थ्यांच्या बोलण्यावर बंदी घातली जात आहे.

अशा शिक्षण व्यवस्थेसंदर्भात भगतसिंह लिहितात, "ज्या युवकांना उद्या देशाची व्यवस्था सांभाळायची आहे. त्यानांच मूर्ख बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा जो परिणाम होईल तो आपण स्वतःच समजून घ्यायचा आहे. आपण हे मानतो की विद्यार्थ्यांचे प्रमुख काम अभ्यास करणे हे आहे, त्यांनी संपूर्ण लक्ष त्याकडेच दिले पाहिजे परंतु देशाच्या परिस्थितीचे ज्ञान आणि त्यामध्ये सुधारणा करण्याचे उपाय शोधण्याची योग्यता निर्माण करणे शिक्षणामध्ये समाविष्ट नाही? जर नसेल तर आम्ही अशा शिक्षणालाही निरुपयोगी समजतो. कारकून बनणाऱ्या शिक्षणाची गरजच काय आहे?" एकूणच शिक्षणासंदर्भात भगत सिंहाचा दृष्टिकोन पाहता असे दिसून येते की शिक्षण हे नोकऱ्या देण्याचे साधन नसून देशाच्या सर्वांगीण विकासाकरिता सदृढ नागरिक निर्माण करण्याची कार्यशाळा आहे. परंतु आजची व्यवस्था ते होण्यापासून रोखते. हीच अवस्था आजच्या शिक्षणसंस्थांमध्ये चरमोत्कर्षापर्यंत पोहचविण्याचे काम सत्ताधारी वर्ग करत आहे.

## संपादकीय »

### भोंगळ भावनावाद!

***प्रगल्भ आणि प्रबुद्ध व्यक्तींची विचारप्रक्रिया बहुतांशी समान प्रतलावर असते. भले त्या व्यक्ती एकत्र, एकाच ठिकाणी असोत वा नसोत. अशांचे विचार एकमेकांस समांतर प्रवास करताना दिसतात.***

प्रगल्भ आणि प्रबुद्ध व्यक्तींची विचारप्रक्रिया बहुतांशी समान प्रतलावर असते. भले त्या व्यक्ती एकत्र, एकाच ठिकाणी असोत वा नसोत. अशांचे विचार एकमेकांस समांतर प्रवास करताना दिसतात. याचा ताजा दाखला म्हणजे विख्यात कलाकार, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक सौरभ शुक्ला यांनी 'लोकसत्ता'च्या व्यासपीठावर कला क्षेत्राविषयी व्यक्त केलेले विचार आणि त्याच वेळी पुण्यात विख्यात लेखक महेश एलकुंचवार यांची कलाकारविषयक मांडणी. अनेक प्रयोग असे संचित त्यांच्या खाती जमा आहे. एलकुंचवार यांचेही तसेच. जागतिक अभिजात वाङ्मयाच्या जोडीने भवभूती, भास, भरतमुनी आदी देशी परंपरेची पोषकतत्त्वे अंगी मुरवत स्वत:च्या मठीत राहून, कोणतेही जनसंपर्की चाळे न करता जागतिक पातळीवर पोहोचता येते.

**गूगल आणि ॲपल या दोन्ही कंपन्यांविरुद्ध एपिक गेम्स या कंपनीनं अमेरिकेत खटले भरले होते. यापैकी 'गूगल' खटल्याचा निकाल अलीकडेच लागला त्यात एपिक जिंकली, हे फक्त गेम खेळणाऱ्यांनाच नव्हे तर सर्व मोबाइलधारकांना लाभदायक ठरेल का? 'ॲपल'सुद्धा झुकेल का?**

# 'एपिक' जिंकल्यामुळे आडत्यांचा 'गेम'!

आमच्या कडे गणिताच्या क्लासला प्रवेश हवा असेल तर तुम्हाला आमचंच फिजिक्स आणि केमिस्ट्री शिकावं लागेल, अन्य ठिकाणी फिजिक्स, केमिस्ट्री शिकणार असाल तर आमच्याकडे गणिताला प्रवेश नाही!' तसेच त्यातील जे अनेक तोटे पण आहेत, त्या तोट्यांमध्ये "आडते" हा शब्द फार महत्त्वाचा. 'आडत' हा शब्द 'कमिशन' याच अर्थानं सहसा वापरला जात असला तरी याचा एक अर्थ 'गेट कीपर' अशा छटेचाही आहे. आता गूगल आणि 'एपिक गेम्स' यांच्यामधील जो खटला सॅन फ्रान्सिस्को मध्ये चालला आणि ज्यात अगदी परवा परवाच 'एपिक गेम्स'चा ऐतिहासिक आणि खऱ्या अर्थाने 'एपिक' विजय झाला, त्याचा आणि गणिताचा क्लास व कृषी उत्पन्न बाजार समितीचा काय संबंध? या तीनही गोष्टींमधला समान धागा म्हणजे आडत! माझा इडली विकायचा धंदा असेल तर मला मी दुसरीकडून आणलेल्या इडल्या माझ्या दुकानात विकायला साधारणत: पाच ते दहा




टक्के कमिशन द्यावे लागते, ते जर ३० ते ४० टक्के झालं तर याचा मला फायदा काहीच नाही. तेच 'ॲप्स'बाबत गूगल करत होतं. गूगल ॲप स्टोअर किंवा ॲपल स्टोअरवर जे काही नवीन पेड ॲप्स अपलोड केले जातात, त्या कंपन्या ॲपल किंवा गूगल यांना १५ ते ३० टक्के फी देतात. एपिक गेम्सची तक्रार अशी होती की ही एवढी फी तर द्यावी लागतेच परंतु गूगलने सॅमसंग किंवा काही चायनीज मोबाईल हँडसेट बनवणाऱ्या कंपन्यांशी बिल्ट इन ॲप्स बाबत टायअप केलंय आणि ती निकोप स्पर्धा नाही. गूगल किंवा ॲपल हे अन्य ॲप स्टोअर्स ना ॲक्सेस देत नाहीत, असा त्यांच्यावर आरोप आहे. होता. 'ॲपल'विरुद्धच्या त्या खटल्याचा निकाल सप्टेंबर २०२१ मध्ये लागला आणि त्यात ॲपल कंपनी जिंकली होती. पण त्या ॲपल खटल्याच्या निकालात आणि गूगलच्या विरुद्ध गेलेल्या १२ डिसेंबरच्या निकालात मोठा फरक आहे. ॲपलच्या केस मध्ये एका न्यायाधीशानीच निर्णय दिला. परंतु गूगलच्या बाबत मात्र एकच न्यायाधीश नसून नऊ ज्यूरींचं न्यायमंडळ होतं, हा झाला प्रक्रियेतला फरक. पण पुढले तपशील जास्त महत्त्वाचे आहेत. ॲपल हे कुठल्याही आयफोन- आयपॅड वा ॲपल (मॅक) संगणकांवर 'साईडलोडिंग'ची शक्यता खुली ठेवत नाही- म्हणजे गेमचं सॉफ्टवेअर इंटरनेटवरून त्यांच्या स्टोअरवर डाऊनलोड करायला परवानगी देत नाही, हे खरं. 'गूगल प्लेस्टोअर'ला डावलून तुम्ही साइडलोडिंग करू शकता, हेही खरं. याचा सरळ अर्थ असा निघायला हवा की जे साइडलोडिंगला परवानगी देत नाहीत ते अधिक एकाधिकार-वादी (मोनोपॉली) आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अधिवेशन बोलावून आरक्षण देणार!

## पुन्हा मराठ्यांचा घात होणार : मनोज जरांगे-पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणप्रश्नी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदन सादर केलं. तसेच, मागावर्गीय आयोगाचा अहवाल आल्यानंतर फेब्रुवारीत विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येईल. तेव्हा, आवश्यकतेनुसार मराठा समाजाला आरक्षण दिलं जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री शिंदेंनी दिलं. मात्र, मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला इशारा दिला आहे.**



विधानसभेत बोलताना एकनाथ शिंदेंनी म्हटलं, “मागासवर्ग आयोग महिन्यभरात आपला अहवाल सादर करेल. त्यानंतर अहवालाचं अवलोकन करण्यात येईल. हा अहवाल आल्यानंतर फेब्रुवारीत विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवून आवश्यकतेनुसार मराठा समाजाला आरक्षण दिलं जाईल. हे आरक्षण देताना इतर कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही. यावर मनोज जरांगे-पाटील म्हणाले, “मागासवर्गीय अहवाल फेब्रुवारीत येण्याबाबत आम्ही अनभिज्ञ आहोत. मागावर्गीय अहवालाची मागणी आम्ही आता केली नाही. कारण, त्यात खूप शंका आहेत. मागावर्गीय अहवालानंतर आरक्षण एनटी आणि व्हिजीएनटीसारखं न्यायालयात टीकेल की नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. हे आरक्षण टीकणार नाही कारण ते ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडते. पुन्हा मराठ्यांचा घात होणार आहे. त्यामुळे २४ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रातील मराठा समाजाला आरक्षण द्यावं. फेब्रुवारीची कालमर्यादा आम्हाला मान्य नाही. २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण न दिल्यास आंदोलन पुकारण्यात येणार,” असा इशारा जरांगे-पाटलांनी शिंदे सरकारला दिला आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी आढळल्या आहेत, त्यांच्या रक्तातील नातेवाईकांना आरक्षणाचा लाभ घेता येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. त्यामुळे ५४ लाख नोंदीच्या आधारावर मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देतील, असं वाटत आहे. नाहीतर २४ डिसेंबरला आम्ही आंदोलन पुकारणार,” असं जरांगे-पाटलांनी म्हटलं. ओबीसींचे आरक्षण हे सामाजिक न्यायासाठी आहे. आरक्षण म्हणजे गरिबी हटाव चा कार्यक्रम नाही. हजारो वर्षाचे सामाजिक मागासलेपणा दुर करण्यासाठी आहे. कुणबी दाखले देऊन मागच्या दाराने आमच्या आरक्षणात त्यांना वाटेकरू होऊ देणार नाही. आमचा त्यांच्या आरक्षणाला विरोध नाही परंतु ओबीसी मधून आम्ही देऊ देणार नाही, असे मत मागासवर्ग आयोगाचे माजी संचालक प्रा. लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले. वाई, खंडाळा व महाबळेश्वर तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांच्या मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून हाके बोलत होते. यावेळी पुणे येथील माजी नगरसेविका रुपाली ठोंबरे – पाटील, ऑल इंडिया मुस्लिम समाज पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अब्दुल सुतार, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, ओबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत लोकरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. हाके पुढे म्हणाले,छगन भुजबळ हे ओबीसींचा आवाज असून त्यांना पद्धतशीरपणे टार्गेट करण्याचे काम केले जात आहे. त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची एकी दाखवण्याची ही वेळ आहे. ओबीसी मध्ये ४५० जाती आहेत. जातनिहाय जनगणना करा आम्ही ६० टक्केच्या वरती आहोत. सर्व सत्तास्थाने कारखाने डीसीसी बँक तुमच्या ताब्यात असताना तुमचा समाज मागास कसा यामुळेच सुप्रीम कोर्टाने आरक्षण नाकारले होते. ३.५ लाख करोडचे महाराष्ट्राचे बजेट आहे. त्यातील ओबीसींसाठी केवळ ०.६ टक्के बजेटची तरतूद केवळ ओबीसींच्या विकासासाठी केली जाते. हे वास्तव तुम्ही जनतेसमोर का मांडत नाही.

### काय म्हणाले एकनाथ शिंदे?

सर्वांची भावना एकच आहे की मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. जी सगळ्यांची भावना आहे ती मुख्यमंत्री म्हणून माझीही भावना आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी किंवा इतर कुठल्याही आरक्षणाला धक्का न लागता आरक्षण मिळालं पाहिजे ही आपली भावना आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने मराठा समाजाने महाराष्ट्राच्या विकासात योगदान दिलं आहे. आज त्याच मराठा समाजाला आरक्षण हवं आहे. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या त्यांना आरक्षण हवं आहे. अन्य मागास समाजाप्रमाणे मराठा समाजालाही प्रगती करायची आहे. त्यामुळे त्यांची मागणी रास्तच आहे. मराठा आरक्षणासाठी काहींनी टोकाचं पाऊल उचलून आत्महत्याही केल्या. ही गोष्ट अतिशय वेदनादायी आहे. आपल्या सगळ्यांच्या भावना यासाठी एकच आहेत. मराठा समाज सगळ्या समाजाशी मिळून मिसळून राहिला आहे. महाराष्ट्राची बांधणी घट्ट करण्याचं काम या समाजाने केलं आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातलं सामाजिक वातावरण, आपली परंपरा ही दुषित करण्याचे काही प्रसंग घडले आहेत. तसे काही प्रयत्न होताना आपण पाहतो आहोत. कुठल्याही दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होणं चांगलं नाही असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# देशातील लोकशाही जगली, तर देश जगेल : उद्धव ठाकरे

## शर्मिला ठाकरे यांनी राज ठाकरेंवरून उद्धव ठाकरेंना टोला लगावला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिल्लीत ‘इंडिया’ आघाडीची बैठक पार पडत आहे. या बैठकीला हजर राहण्यासाठी शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे सोमवारी दिल्लीत दाखल झाले. आज मंगळवारी ( १९ डिसेंबर ) उद्धव ठाकरेंनी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. “पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे,” असं रणशिंग उद्धव ठाकरेंनी फुकलं आहे.**

उद्धव ठाकरे म्हणाले, “ऑगस्टनंतर ‘इंडिया’ आघाडीची बैठक झाली नाही. कारण, तीन-चार राज्यांतील निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील पक्ष सामील होते. त्यामुळे ऑगस्टनंतर ‘इंडिया’ आघाडीची बैठक होत आहे. तीन राज्यांच्या निवडणुकीवर बैठकीत चर्चा होणं आवश्यक आहे.” इंडिया आघाडीत २७ घोडे, पण रथाला सारथी नाही. २०२४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर चेहरा असण्याची गरज आहे का? असा प्रश्न प्रतिनिधीनं विचारल्यावर उद्धव ठाकरेंनी म्हटलं, “पंतप्रधानांसमोर चेहरा हा एक विषय आहेच. मात्र, ‘इंडिया’ आघाडीला समन्वयक किंवा एखाद्या चेहऱ्याबाबत आज नाहीतर उद्या विचार करावा लागेल. आमच्यातील कुणाच्याही डोक्यात नेतृत्वाची हवा भरली नाही. आम्हाला देश वाचवायचा आहे. खासदारांचं निलंबन आणि महाराष्ट्र विधिमंडळातील चित्र पाहून देशातील लोकशाही अंतिम घटका मोजत आहे का? असा प्रश्न निर्माण झालाय. पण, देशातील लोकशाही जगली, तर देश जगेल. ती जगवण्यासाठी ‘इंडिया’ आघाडीच्या नेतृत्वाखाली आम्ही एकत्र आलो आहोत,” असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं. इंडिया’ आघाडीतील नेत्यांनी पंतप्रधान चेहऱ्याबाबत तुमच्या नावावर सहमती दर्शवली तर जबाबदारी घेणार का?



या प्रश्नावर उद्धव ठाकरे म्हणाले, “मी असं अजिबात बोलत नाही. पण, माझे काही मते बैठकीत मांडणार आहे. मी मुख्यमंत्रीपद हे जबाबदारी म्हणून स्विकारलं होतं. नंतर एका क्षणात ते सोडून दिलं. मी कुठलीही वेडीवाकडी स्वप्न पाहत नाही. देश आणि महाराष्ट्रातील जनता आमच्याकडे पाहत आहे. मी पंतप्रधानपदाचे स्वप्न पाहून उपयोग काय आहे? शेवटी हा निर्णय जनतेला घ्यायचा आहे.”

### काय म्हणाल्या शर्मिला ठाकरे?

आभार मानण्याची वेळ मला उद्धव ठाकरेंनी आयुष्यात कधीच दिली नाही. किणी प्रकरणापासून आजपर्यंत जेवढ्या वेळेला मिळेल तेव्हा आम्हाला ते चिमटे काढत असतात. निदान जो भाऊ तुमच्या बरोबर लहानपणापासून मोठा झाला त्याच्यावर थोडा तरी विश्वास ठेवला असतात ना तर आम्हाला कधीतरी आभार मानायची वेळ असती. जी आता त्यांच्यावर आली आहे. मी माझ्या पुतण्यावर (आदित्य ठाकरे) विश्वास ठेवला. मी सांगितलं की तो असं काही करेल वाटत नाही. पण तुम्ही ज्या भावाबरोबर मोठे झालात आयुष्यभर त्याला किणी प्रकरणाच्या वेळी का मदत केली नाही? आजपर्यंत कुठलीही वेळ आली की आम्हाला टोमणे मारतात. तुम्ही तुमच्या भावावर कधीतरी विश्वास ठेवून दाखवा.

# आघाडीची पुढील रणनीती काय?

## खासदारांच्या निलंबनाविरोधात 22 डिसेंबरला आंदोलन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पाच राज्यांच्या निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर आजची इंडिया आघाडीची निर्णायक बैठक झाली. जागा वाटपातील तिढा कसा सोडवायचा आणि निवडणुकांच्या विजयाची रणनीती कशी आखायची यासंदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याचं मल्लिकार्जुन खरगेंनी माध्यमांना सांगितलं. तसंच, खासदारांना निलंबित केल्यावरूनही त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.**

“आजच्या चौथ्या बैठकीत २८ पक्षांनी सहभाग घेतला होता. या २८ पक्षाच्या नेत्यांनी त्यांची मते समितीसमोर ठेवली आहेत. समस्या सोडवण्याकरता संपूर्ण देशभर ८ ते १० बैठका सर्वांनी मिळून करण्याचा निर्णय झाला. आजची बैठक दोन ते तीस चालली”, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. “१५१ खासदारांना सभागृच्या बाहेर टाकून सरकार चालवत आहे. हे लोकशाहीच्या विरोधात आहे. लोकशाहीला वाचवायचं असेल तर आपल्याला एकत्र येऊन लढावं लागेल आणि त्यासाठी आपण सर्व तयार आहोत. देशाच्या लोकशाहीत हे पहिल्यांदाच घडलं आहे की. जो मुद्दा सभागृहात उचलला आहे तो चुकीचा नव्हता.

जे लोक सभागृहाच्या आतमध्ये आले, ते कसे आले? त्यांना कोणी आणलं? कोणत्या प्रकारे त्यांनी सर्व ठिकाणी जाऊन घोषणाबाजी केली. आम्ही आधीपासूनच सांगत आलोय की गृहमंत्री आणि पंतप्रधानांनी सभागृहात यावं आणि जे घडलंय त्याबाबत सभागृहात माहिती द्यावी. परंतु, त्यांनी ऐकलं नाही”, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. “मला कळत नाही, सभागृह सुरू असताना हे विविध ठिकाणी उद्घाटनाला जातात. हे काय सुरू आहे. असं कधीच नाही झालं. सगळीकडे भाषण द्यायला जातात पण, लोकसभा आणि राज्यसभेत हे येत नाहीत. लोकशाही संपवायची यांची इच्छा आहे. १५१ लोकांचं निलंबन



करून त्यांना बाहेर काढण्यात आलं आहे. हे पहिल्यांदाच घडलं आहे. हे अत्यंत वाईट आहे. या विरोधात आम्ही लढणार आहोत. याविरोधात आम्ही मैदानात जाणार आहोत. आज पंतप्रधान आणि गृहमंत्री समजत आहेत की त्यांच्याशिवाय या देशात कोणीच नाही, तर त्यांचा हा समज संपवण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. सर्वजण मिळून आंदोलन करणार आहोत. २२ डिसेंबर रोजी आम्ही देशभर याविरोधात आंदोलन करणार आहोत”, असंही मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. “इंडिया आघाडीचा एक मुद्दा आहे, सर्व लोक मिळून काम करतील. राज्या-राज्यातील नेते एकत्र येऊन जागा वाटपाबाबत चर्चा करतील. राज्यांतर्गत हा प्रश्न हाताळता नाही आला तर त्यावर इंडिया आघाडीचे नेते यावर चर्चा करतील. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, बिहार, उत्तर प्रदेशातील समस्या यामुळे सुटतील. दिल्ली, पंजाबमधील समस्याही सोडवल्या जातील. हे आजच्या बैठकीत ठरवण्यात आलं आहे. या बैठकीत २८ पक्षातील नेत्यांनी सहकार्य केलं”, असंही खरगे म्हणाले. पंतप्रधानपदाचा चेहरा कोण असणार याकडेही

### पंतप्रधानांनी माहिती द्यावी

» संपूर्ण देशभर ८ ते १० बैठका सर्वांनी मिळून करण्याचा निर्णय झाला. आजची बैठक दोन ते तीस चालली”, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. १५१ खासदारांना सभागृच्या बाहेर टाकून सरकार चालवत आहे. हे लोकशाहीच्या विरोधात आहे. लोकशाहीला वाचवायचं असेल तर आपल्याला एकत्र येऊन लढावं लागेल आणि त्यासाठी आपण सर्व तयार आहोत. देशाच्या लोकशाहीत हे पहिल्यांदाच घडलं आहे की. जो मुद्दा सभागृहात उचलला आहे तो चुकीचा नव्हता. जे लोक सभागृहाच्या आतमध्ये आले, ते कसे आले? त्यांना कोणी आणलं? कोणत्या प्रकारे त्यांनी सर्व ठिकाणी जाऊन घोषणाबाजी केली. आम्ही आधीपासूनच सांगत आलोय की गृहमंत्री आणि पंतप्रधानांनी सभागृहात यावं आणि जे घडलंय त्याबाबत सभागृहात माहिती द्यावी.

सर्वांचं लक्ष लागलं आहे. याबाबत मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आम्हाला आधी सर्वांना जिंकून यावं लागणार आहे. जिंकण्यासाठी काय करायचं आहे, याचा विचार करावा लागेल. पंतप्रधान कोण होणार ही नंतरची गोष्ट आहे. खासदारच नाही आले तर पंतप्रधान ठरवून काय फायदा? त्यामुळे आधी आम्ही संख्या वाढवण्याकरता एकत्रितपणे लढून बहुमत आणण्याचा प्रयत्न करू. “एक-दोन निवडणुका झाल्यानंतर मोदींना प्रचंड गर्व आला आहे की संपूर्ण जगात मीच एकटा नेता आहे, असं त्यांना वाटू लागलं आहे. त्यामुळे आम्ही आधी जिंकण्याचा प्रयत्न करू आणि एक होऊन आम्ही लढू”, असंही ते म्हणाले. “आजच्या चौथ्या बैठकीत २८ पक्षांनी सहभाग घेतला होता. या २८ पक्षाच्या नेत्यांनी त्यांची मते समितीसमोर ठेवली आहेत. समस्या सोडवण्याकरता संपूर्ण देशभर ८ ते १० बैठका सर्वांनी मिळून करण्याचा निर्णय झाला. आजची बैठक दोन ते तीस चालली”, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.

# ८० लाख लोकांच्या नोकऱ्या जाणार?

## ड्रायव्हरलेस कार आणल्या जाणार नाहीत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी चालकांच्या रोजगाराचे रक्षण करण्यासाठी भारतात ड्रायव्हरलेस कार आणल्या जाणार नाहीत असे ठाम मत व्यक्त केले आहे. रस्त्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करताना, भारतातील रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, “मी अमेरिकेतच सांगितले होते की, मी कोणत्याही किंमतीत भारतात चालकविरहित कार येऊ देणार नाही.**



याचे कारण म्हणजे, आपल्या देशात, मोठ्या संख्येने लोक ड्रायव्हर म्हणून काम करतात. ड्रायव्हरलेस कारमुळे त्यांच्या नोकऱ्या हिसकावून घेतल्या जाऊ शकतात, यामुळे तब्बल 70 ते 80 लाख लोकांची नोकरी जाऊ शकते, त्यामुळे मी कुठल्याही किमतीत अशा गाड्या भारतात येऊ देणार नाही.” गडकरींनी ऑटोमोटिव्ह इंजिनीअरिंगमधील प्रगतीवर भर देत म्हटले की, ऑटोमोबाईलमध्ये सहा एअरबॅग्ज समाविष्ट करणे, रस्त्यांवरील खड्डयांचे पॅच कमी करणे आणि इलेक्ट्रिक मोटर्स कायद्यांतर्गत दंड वाढवणे, रुग्णवाहिकांच्या प्रवासासाठी अधिक सोय उपलब्ध करून देणे, या गोष्टींवर भर देणे अधिक महत्त्वाचे वाटते. “टेस्लाचे भारतात स्वागत होत असले तरी भारतात विक्रीसाठी चीनमध्ये उत्पादन तयार करणे हा पर्याय नाही. आम्ही टेस्ला भारतात येण्याची परवानगी देऊ पण ते चीनमध्ये उत्पादन करून भारतात विकू शकत नाहीत. हे घडणे अशक्य आहे,” असे गडकरी म्हणाले. नितीन गडकरी यांनी भविष्यातील इंधन म्हणून हायड्रोजनच्या महत्त्वावर भर दिला आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची सरकारची भूमिका सुद्धा सांगितली. “हायड्रोजन हे भविष्यातील महत्त्वाचे इंधन आहे. आम्ही सार्वजनिक पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी सर्वोत्तम तंत्रज्ञान आणण्याच्या दिशेने काम करत आहोत,” असं गडकरी पुढे म्हणाले.

# काँग्रेसने भाजपावर केला ‘हा’ आरोप!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मध्य प्रदेशमध्ये भाजपाचं सरकार आल्यानंतर नव्या सरकारने सोमवारी पहिलं विधानसभा विशेष अधिवेशन आयोजित केलं होतं. यावेळी सदनात असलेला पंडित जवाहरलाल नेहरु यांचं तैलचित्र हटवण्यात आलं आहे.

विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीमागे दोन तैलचित्रं होती त्यातला एक महात्मा गांधींचा होतं आणि दुसरं पंडित नेहरुंचं तैलचित्र होतं.त्यातील पंडित नेहरुंचं तैलचित्र हटवण्यात आलं आहे.ज्यामुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसने भाजपाव आरोप केला आहे. मध्य प्रदेशमध्ये ही घटना घडल्यानंतर काँग्रेसने आता हा आरोप केला आहे की भाजपाला देशाचा इतिहास पुसून टाकायचा आहे. त्यामुळेच ते अशा प्रकारची कृती करत आहेत. मध्य प्रदेश काँग्रेसचे पक्ष प्रवक्ते अब्बास हाफीज यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवर पोस्ट लिहिली आहे.

त्यावर त्यांनी मध्य प्रदेश विधानसभेतून पंडित नेहरु यांचं तैलचित्र हटवल्याचा निषेध नोंदवला आहे. अब्बास हफीज म्हणाले आहे की देशाचं हे दुर्दैव आहे की भाजपा सत्तेत आहे. भाजपाने देशाचा इतिहास मिटवण्याची तयारी सुरु केली आहे. काही दशकांपूर्वी पंडित नेहरुंचं तैलचित्र विधानसभेत लावण्यात आले होते जे हटवण्यात आले.

# गौरीवर ईडी करणार कारवाई?

बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानची पत्नी गौरी खान हिच्या अडचणीत वाढणार आहे. ईडी गौरी खानची चौकशी करण्याच्या तयारीत आहे. गौरी खान ही लखनौस्थित रिअल इस्टेट कंपनी तुलसियानी ग्रुपची ब्रँड ॲम्बेसेडर आहे. तिला ईडीने समन्स बजावलं आहे. या कंपनीवर गुंतवणुकदार आणि बँकेकडून अंदाजे 30 कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप कंपनीवर आहे. पैशांची अफरातफर केल्याच्या आरोपामुळे आता या कंपनीची चौकशी होणार आहे ज्यात गौरी खानचे नाव देखील सामील आहे. गौरी खानला ब्रँड ॲम्बेसेडर बनवण्यासाठी तुलसियानी ग्रुपने किती पैसे दिले होते आणि त्यासाठी काही करार होता का? या प्रश्नाचा शोध ईडी अधिकारी घेत आहे. तर या प्रकरणी ईडी गौरी खानची देखील चौकशी करण्याच्या तयारीत आहे. मात्र, गौरीकडून सध्या यावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. लखनऊमधील सुशांत गोल्फ सिटीमध्ये तुलसियानी ग्रुपचा एक प्रकल्प आहे. मुंबईचे रहिवासी किरीट जसवंत शहा यांनी या प्रकल्पात 2015 मध्ये 85 लाख रुपयांना फ्लॅट खरेदी केला होता. मात्र आता कंपनी त्यांना ना फ्लॅटचा ताबा देत आहे ना त्यांची रक्कम परत करत आहेत. त्यामुळे जसवंत शहा यांनी तुलसियानी समूहाचे संचालक अनिल कुमार तुलसियानी, महेश तुलसियानी आणि गौरी खान यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तर या प्रकरणात किरीट जसवंत शाह यांनी गौरी खानवर देखील काही आरोप केले आहे. या प्रकल्पाची जाहिरात गौरी खानने केली होती आणि त्यामुळेच गौरीवर विश्वास ठेवून ही मालमत्ता खरेदी केली. या प्रकरणी आता परवानगी मिळाल्यानंतर ईडी गौरी खानची चौकशी करेल अशी चर्चा आहे.



# जॅकलिनची उच्च न्यायालयात धाव!

बॉलीवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस ही तिच्या चित्रपटापेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे जास्तच चर्चेत असते. यासोबतच जॅकलिन फर्नांडिस 200 कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणामुळे देखील चर्चेत आहे. या प्रकरणी गेल्या अनेक दिवसांपासून तिची चौकशी सुरु आहे. आता जॅकलीन फर्नांडिसने तिच्यावरील 200 कोटी रुपयांचा मनी लॉन्ड्रिंग खटला रद्द करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. इडीच्या तक्रारीत आणि त्यांच्या पुरवणी आरोपपत्रात आरोपी म्हणून तिचे नाव देण्याविरोधात जॅकलिनने आता न्यायालयात याचिका दाखल केली आहे. दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात जॅकलिनला फिर्यादी साक्षीदार म्हणून हजर करण्यात आल्याचा उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे. यावेळी सुकेश चंद्रशेखर आणि त्याच्या साथीदारांनी केलेल्या गुन्ह्याबद्दल तिला काहीही माहिती नसल्याचे तिने या याचिकेत म्हटले आहे. जॅकलिनने मनी लाँड्रिंगशी जोडण्यात आलेल्या पीएमएलए 2000च्या अंतर्गत कुठलाही गुन्हा केलेला नाही आणि ती कुठल्याही गुन्ह्यात सहभागी नव्हती. असे देखील म्हटले आहे. कॉनमन सुकेश चंद्रशेखर बाबात बोलायचे झाले तर विविध तपास यंत्रणांनी त्याच्यावर 30 हून अधिक आरोप केले आहेत. तुरुंगात असतानाही व्हॉईस मॉड्युलेशन सॉफ्टवेअर आणि स्पूफिंग कॉल वापरून त्याने दिल्लीतील एका व्यावसायिकाच्या पत्नीकडून 215 कोटी रुपये उकळल्याचा त्याच्यावर आरोप आहे. यासोबत अनेक आरोपामुळे सुकेश तुरुंगात आहे. तर या प्रकरणा दरम्यान जॅकलिन फर्नांडिसचे त्याच्यासोबतचे काही फोटो समोर आल्यानंतर तिचे नाव सुकेशसोबत जोडले गेले. दोघेही एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा होत्या. या सगळ्यातही सुकेश दर महिन्याला जॅकलिन फर्नांडीसला प्रेम पत्र पाठवत असतो. ज्याची सोशल मिडियावर चर्चा होत असते. आता या प्रकरणी तिने कोर्टात धाव घेतल्याने जॅकलिनला या प्रकरणी दिलासा मिळणार की नाही याकडे तिच्या चाहत्यांच्या नजरा लागल्या आहेत. बॉलीवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस ही तिच्या चित्रपटापेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे जास्तच चर्चेत असते. यासोबतच जॅकलिन फर्नांडिस 200 कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणामुळे देखील चर्चेत आहे. या प्रकरणी गेल्या अनेक दिवसांपासून तिची चौकशी सुरु आहे. आता जॅकलीन फर्नांडिसने तिच्यावरील 200 कोटी रुपयांचा मनी लॉन्ड्रिंग खटला रद्द करण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. इडीच्या तक्रारीत आणि त्यांच्या पुरवणी आरोपपत्रात आरोपी म्हणून तिचे नाव देण्याविरोधात जॅकलिनने आता न्यायालयात याचिका दाखल केली आहे. दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात जॅकलिनला फिर्यादी साक्षीदार म्हणून हजर करण्यात आल्याचा उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे.



# मलायकाचा एक व्हिडीओ व्हायरल

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा ही तिच्या ग्लॅमरस स्टाईलनं आणि डान्सनं प्रेक्षकांची मनं जिंकते. पण नुकताच मलायकाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये मलयाकाचा एक चाहता तिच्यासोबत फोटो काढताना दिसत आहे. या व्हिडीओची चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहे. मलायका अरोरा 'झलक दिखला जा 11' (JHALAK DIKHLA JA) या डान्स रिॲलिटी शोमध्ये जजच्या भूमिकेत दिसणार आहे. या कार्यक्रमाच्या सेटवरील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये मलायका ही लाल रंगाची साडी आणि मोकळे केस अशा ग्लॅमरस लूकमध्ये दिसत आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, मलायकाचा एक चाहता तिच्यासोबत फोटो काढायला येतो. फोटो काढताना तो चाहता मलायकाच्या कंबरेवर हात ठेवतो. मलायकाचा बॉडीगार्ड त्या चाहत्याच्या जवळ येतो आणि मलायकाच्या कंबरेवरुन हात काढून टाकतो. मलायकाच्या व्हायरल व्हिडीओला कमेंट करुन नेटकरी मलायकाचं भरभरून कौतुक करत आहेत. एका नेटकऱ्यानं मलायकाच्या व्हिडीओला कमेंट केली, 'आजपासून तिला कोणीही ट्रोल

# अनुष्का शर्माची खास पोस्ट

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री अनुष्का शर्मा ही गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अनुष्का ही दुसऱ्यांदा प्रेग्नंट आहे, अशी चर्चा बऱ्याच दिवसांपासून होत आहे. विराट कोहली (VIRAT KOHLI) आणि अनुष्का शर्मा हे लवकरच दुसऱ्यांदा आई-बाबा होणार आहे, अशी चर्चा सोशल मीडियावर होत आहे. अशातच आता अनुष्कानं एक खास पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे.

# या' पक्षाकडून निवडणूक लढवायला कंगना तयार

अभिनेत्री कंगना रणौत सध्या चांगलीच चर्चेत आहे. कंगनाला आपण आजवर अनेक सिनेमांमधून अभिनय करताना पाहिलंय. कंगना गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. याचं कारण म्हणजे.. कंगना २०२४ च्या लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात उभी राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या सर्व गोष्टींवर कंगनाच्या वडिलांनीच शिक्कामोर्तब केलाय. तर जागरणने दिलेल्या वृत्तानुसार अभिनेत्री कंगना रणौत लोकसभा निवडणूक लढवणार आहे. वडील अमरदीप रणौत यांनी याविषयी विधान केलंय. त्यांच्या म्हणण्यानुसार भाजपने कंगनाला निवडणुकीचं तिकीट दिल्यास ती निवडणूक लढवण्यास तयार आहे. भाजप कंगनाला हिमाचल, महाराष्ट्र किंवा उत्तर प्रदेशमधून उमेदवारी देण्याची शक्यता तिच्या वडिलांनी वर्तवली आहे. याशिवाय भाजपने कंगनाला हिमाचलमधून उमेदवारी देण्याचा निर्णय घेतल्यास मंडी लोकसभा मतदारसंघ हे तिचे कार्यक्षेत्र असेल. कंगना ही मूळची हिमाचलची आहे. अशातच तिने रविवारी कुल्लू येथे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांची भेट घेतली. या भेटीनंतर कंगनाने निवडणूक लढविण्याच्या चर्चेने राजकीय वातावरण पुन्हा तापू लागले आहे. काही महिन्यांत कंगनाची जेपी नड्डासोबत तिसरी भेट आहे. जेपी नड्डा यांनी कंगनाच्या मनाली येथील निवासस्थानी भाजपच्या इतर नेत्यांसोबत नाश्ताही केला होता.



# पॅट कमिन्सने इतिहास रचला!

## » हैदराबादने कमिन्ससाठी 20 कोटी 75 लाख केले खर्च

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियन संघाला एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये चॅम्पियन बनवणारा कर्णधार पॅट कमिन्सने आयपीएल २०२४ लिलावात इतिहास रचला. तो आतापर्यंत विकला जाणारा दुसरा सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. या लिलावात सनरायझर्स हैदराबादने पॅट कमिन्सला विकत घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. पॅटसाठी सनरायझर्स हैदराबादला २० कोटी ५० लाख रुपये मोजावे लागले. आरसीबीनेही आटोकाट प्रयत्न केले, पण या संघाने आपली पर्स लक्षात घेऊन हैदराबादसमोर शरणागती पत्करली.**

पॅट कमिन्सची मूळ किंमत २ कोटी रुपये होती आणि तो सुरुवातीला सर्वात महाग विकला जाणारा खेळाडू होता, परंतु नंतर त्याच्या संघाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने त्याचा विक्रम मोडला. त्याला केकेआरने २४ कोटी ७५ लाख रुपयांना विकत घेतले. आतापर्यंतच्या आयपीएल इतिहासात कमिन्स आणि स्टार्क हे दोनच खेळाडू आहेत, ज्यांना संघाने २० कोटींहून अधिक रुपयांना विकत घेतले आहे. आयपीएल २०२४ च्या लिलावाच्या सुरुवातीला पॅट कमिन्सला हैदराबादने २० कोटी ५० लाख रुपयांना विकत घेतले. त्यामुळे असे वाटत होते की, तो आतापर्यंतचा सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे, परंतु मिचेल स्टार्कने काही काळानंतर त्याचा विक्रम मोडला. अर्थात, या हंगामात पॅट कमिन्स सर्वात महागड्या खेळाडूंच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आला आहे, परंतु २०२० मध्ये तो सर्वात महागडा खेळाडू ठरला होता. त्या हंगामात पॅट कमिन्सला केकेआरने १५ कोटी ५० लाख रुपयांना विकत घेतले होते. पॅट कमिन्स हा आयपीएल २०२२ मध्ये केकेआर संघाचा भाग होता. त्याला या संघाने ७.२५ कोटी रुपयांना विकत घेतले, परंतु नंतर त्याला सोडून दिले. तो २०२३ साली आयपीएलमध्ये खेळला नव्हता, परंतु यावेळी त्याच्या संघाला एकदिवसीय विश्वचषकात विजय मिळवून दिल्यानंतर त्याची मागणी वाढली. त्यामुळे तो हैदराबादकडून खेळताना दिसणार आहे. कमिन्सच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल



बोलायचे झाले तर, त्याने या लीगमधील ४२ सामन्यांत ४५ बळी घेतले आहेत. ३४ धावांत ४ विकेट्स ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. कमिन्स २०१४ मध्ये पहिल्यांदा आयपीएलमध्ये खेळला होता आणि यावेळी त्याला फक्त एकाच सामन्यात खेळण्याची संधी मिळाली आणि त्याला फक्त एक विकेट मिळाली होती. त्याने आतापर्यंत ३७९ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याची सर्वोच्च धावसंख्या ६६ धावा आहे. इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या (IPL 2024) येत्या हंगामासाठी लिलाव प्रक्रिया पार पडत आहे. आयपीएलच्या 2008 पासून ते आतापर्यंतच्या (IPL 2024 AUCTION PLAYERS LIST) इतिहासातील सर्वाधिक रक्कम ऑस्ट्रेलियाचा विश्वविजेता कर्णधार पॅट कमिन्सला (PAT CUMMINS) मिळाली आहे. सनरायजर्स हैदराबादने कमिन्सला तब्बल 20.50 कोटी रुपयांना आपल्या ताफ्यात घेतलं. कमिन्सची बेस प्राईस 2 कोटी रुपये होती. आयपीएलच्या इतिहासातील तो सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. (MOST EXPENSIVE PLAYER IN THE HISTORY OF IPL) दुसरीकडे क्रिकेट विश्वचषकात सर्वांचं लक्ष वेधून घेणारा न्यूझीलंडचा डॅशिंग सलामीवीर रचिन रवींद्रला (RACHIN RAVINDRA) अपेक्षित किंमत मिळाली नाही. रचिन रवींद्रला चेन्नई सुपर किंग्जने (CSK) अवघ्या 1.80 कोटी रुपयात संघात सामावून घेतलं. आयपीएल२०२४ साठी मिनी लिलाव सुरू आहे. लिलावात ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क आणि कर्णधार पॅट कमिन्स यांना २०२३मध्ये टूर्नामेंट जिंकलेल्या संपूर्ण संघापेक्षा जास्त पैसे मिळाले आहेत. चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल २०२३मध्ये विजेतेपद पटकावले, त्यानंतर त्यांना बक्षीस म्हणून २० कोटी रुपये मिळाले. पण २०२४च्या लिलावात स्टार्क आणि कमिन्स यांना २० कोटींहून अधिक रुपयांना विकत घेण्यात आले. यानंतर मिचेल स्टार्कने त्याच्यावर लागलेल्या या बोलीवर भावना व्यक्त केल्या आहेत. मिचेल स्टार्क म्हणाला, “नक्कीच हा माझ्यासाठी धक्का होता. माझी पत्नी ॲलिसा भारतातील महिला संघाबरोबर आहे त्यामुळे मी स्क्रीनवर जे पाहत होतो त्यापेक्षा तिला लवकर अपडेट मिळत होते. माझ्यापेक्षा ती जास्त आश्चर्यचकित आणि रोमांचित होत होती.

### ही चांगली संधी आहे

» आयपीएलमध्ये खूप काळानंतर मिचेल स्टार्क पुनरागमन करत आहे. काही काळासाठी तो आयपीएलपासून दूर होता. यावर तो म्हणाला की, “हो, खूप काळ मी आयपीएलपासून दूर होतो. मी २०१४-१५ मध्ये आरसीबीमध्ये सहभागी झालो होतो, त्यानंतर २०१८ मध्ये केकेआरने मला सामील केले पण मला त्यावेळी दुखापत झाली होती. त्यामुळे मी ऑस्ट्रेलियासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि कसोटी क्रिकेटला प्राधान्य देत होतो. मला आयपीएलमध्ये परत यायचे होते मात्र, योग्य संधी मिळत नव्हती. या वर्षाच्या शेवटी ऑस्ट्रेलियासाठी आयसीसी स्पर्धा जिंकवून देऊ शकलो म्हणून खूप समाधान वाटत आहे. आयपीएलमध्ये एक ऑस्ट्रेलियन म्हणून त्यात सहभागी होण्यासाठी मी खूप उत्साही आहे. येत्या वर्षात टी-२० विश्वचषक येत असलेल्या, सर्वोत्तम टी-२० लीगमध्ये खरोखर स्पर्धात्मक टी-२० क्रिकेट खेळण्याची, ही चांगली संधी आहे.

# साई सुदर्शन-के.एल. राहुलचे शानदार अर्धशतक!

## » इंडियाने दक्षिण आफ्रिकेसमोर ठेवले 212 धावांचे लक्ष्य

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना मंगळवारी (१९ डिसेंबर) खेळवला जात आहे. गकबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्क येथे दोन्ही संघ आमनेसामने आहेत. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करामने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.**





दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. जर भारताने हा सामना जिंकला तर ही एकदिवसीय मालिका खिशात घालेल. तब्बल २०१८ नंतर ही एकदिवसीय मालिका भारत दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर जिंकेल. दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघाला २११ धावांत गुंडाळले. आवेश खानच्या रूपाने टीम इंडियाला १०वा धक्का बसला. ९ चेंडूंवर ९ धावा करून तो धावबाद झाला. भारत ४६.२ षटकात सर्वबाद २११ धावांवर आटोपला. भारताकडून साई सुदर्शनने सर्वाधिक ६२ धावा केल्या. कर्णधार के.एल. राहुलने ५६ धावांची खेळी केली. अर्शदीप सिंगने १८ धावा केल्या. रिंकू सिंगला पदार्पणाच्या वन डेत केवळ १७ धावा करता आल्या. संजू सॅमसन १० धावा करून बाद झाला तर तिलक वर्मा १० धावा करून बाद झाला. आवेश खान नऊ, अक्षर पटेल सात, ऋतुराज गायकवाड चार आणि कुलदीप यादव एक धावा करून बाद झाला. मुकेश कुमारने नाबाद चार धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून नांद्रे बर्गरने तीन विकेट्स घेतल्या. लिझाद विल्यमसन आणि एडन मार्कराम यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. भारताचा डावखुरा फलंदाज रिंकू सिंगला पदार्पणाची संधी मिळाली आहे. नाणेफेकीपूर्वी कुलदीप यादवने त्याला वनडे कॅप दिली. कसोटी मालिकेच्या तयारीसाठी श्रेयस अय्यरने एकदिवसीय मालिकेतून माघार घेतली आहे. पहिल्या सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर खेळताना त्याने शानदार अर्धशतक झळकावले. अशा परिस्थितीत त्याच्या जागी रजत किंवा रिंकूला संधी मिळू शकते, असे वाटत होते आणि रिंकूला संधी मिळाली.

### अर्शदीप सिंगने 18 धावा केल्या

» भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना मंगळवारी (१९ डिसेंबर) खेळवला जात आहे. गकबेरहा येथील सेंट जॉर्ज पार्क येथे दोन्ही संघ आमनेसामने आहेत. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करामने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

# न्याय हक्कांसाठी सोसायटीधारकांचे जोरदार शक्तीप्रदर्शन!

## महास्नेह संमेलनाला 15 हजाराहून अधिक गर्दी : समस्या, आव्हांनावर मात करण्यासाठी वज्रमूठ

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील सोसायटी धारकांसाठी पहिल्यांदाच आयोजित केलेल्या महास्नेहसंमेलनाला तब्बल १५ हजारहून अधिक सदनिकाधारकांनी सहभाग घेतला. या संमेलनामध्ये पायाभूत सोयी-सुविधांसाठी भेडसावणाऱ्या समस्या आणि आव्हांनावर उहापोह करण्यात आला. एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेली गर्दी पाहता सोसायटीधारकांनी जोरदार शक्तीप्रदर्शन पहायला मिळाले.**



चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या पुढाकाराने महास्नेहसंमेलन भरवण्यात आले. यावेळी आमदार महेश लांडगे, भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, सोसायट्यांचे हे महास्नेहसंमेलन घेण्या पाठीमागचा उद्देश सांगत असताना पिंपरी चिंचवड शहरातील सर्व सोसायटी धारकांना एका छताखाली आणून, सर्वांना एकसंघ करून सरकारी यंत्रणा आणि आपल्या सर्व प्रस्थापितांना आपली ताकद दाखवणे गरजेचे होते म्हणून असे एकत्रित महास्नेहसंमेलन घेणे गरजेचे होते. सोसायटी फेडरेशनचा जन्मच सोसायटी धारकांच्या समस्या सोडवण्यासाठी सोसायटी धारकांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करण्यासाठी झालेला आहे. आमचे फेडरेशन समाजकारण करते सोसायट्यांसाठी काम करते कोणतेही राजकारण करत नाही.



### सोसायटी फेडरेशन अराजकीय...

» फेडरेशन हे अराजकीय काम करते फेडरेशन कोणत्याही राजकीय नेत्याला किंवा पक्षाला बांधील नाही फेडरेशन हे कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा नेत्यांची भूमिका किंवा त्याला समर्थन करत नाही असेही सांगळे यांनी सांगितले. मात्र, पण जे जे राज्यकर्ते जे स्थानिक पदाधिकारी आपल्याला मदत करतात त्यांना त्यांचा पक्ष न बघता त्यांचे आपण समर्थन करतो जसे आदरणीय आमदार महेशदादा लांडगे यांच्यासारख्या राजकीय व्यक्तींना समर्थन करतो सपोर्ट करतो. कारण आजपर्यंत जी, जी काम आपण आमदार महेश लांडगे यांना सांगितली ती सर्व काम त्यांनी पूर्ण केलेली आहेत त्यामध्ये ओला कचरा उचलने असेल, पाण्याची समस्या असेल, राज्याच्या अधिवेशनामध्ये सोसायटी धारकांचे प्रश्न मांडने असेल, सोसायटीच्या जवळ होणारे कचरा संकलन केंद्र दुसरीकडे हटवणे असेल, असा अनेक मुद्यांवर आमदार लांडगे यांनी सहकार्य केले. त्यामुळे आम्ही त्यांना सपोर्ट करतो, असा दावाही सांगळे यांनी केला.

### मी सोसायटीधारकांच्या सोबत: आ. महेश लांडगे

»आमदार महेश लांडगे यांनी त्यांची भूमिका मांडताना सोसायटी फेडरेशन हे अराजकीय आहे. परंतु, सोसायटी फेडरेशनच्या कुठल्याही कामांमध्ये कोणत्याही प्रकारची माझी मदत लागत असेल तर ती मी पूर्वीपासून करत आलेलो आहे आणि पुढे देखील करणार आहे. सोसायटी फेडरेशनला कोणी वैयक्तिक त्रास देत असेल बिल्डर असतील ,स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी असतील किंवा इतर कोणी असेल असे कोणी सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांना त्रास देत असेल तर मी तुमच्या पाठीशी आहे त्यामुळे कुणालाही घाबरायची गरज नाही अशी ठाम भूमिका आणि समर्थन आमदार महेश लांडगे यांनी दिले.

“ पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणाऱ्या लोकसंख्येमध्ये ७० टक्के लोकसंख्या ही सोसायटीधारकांची आहे. सोसायटीधारकांना एका छत्राखाली आणणे आणि आपला एक दबाव गट तयार करून प्रशासकीय यंत्रणा असेल किंवा प्रस्थापित असतील त्यांना दखल घेण्यास भाग पडणे हा आजच्या महास्नेहसंमेलन मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता. लोकांचा हा प्रतिसाद पाहता आमचा हा उद्देश साध्य झाला आहे, असे आम्हाला वाटते. प्रत्येक गोष्टीमध्ये आमचे मत आमचा विचार घेऊनच शहराच्या विकासाचे राजकारण किंवा समाजकारण करावे लागेल. सोसायटीधारकांमध्ये निर्माण केलेली ही चळवळ अशीच पुढे चालू राहील आणि एकसंघपणे सर्वांना एकत्र करून सोसायटी धारकांच्या समस्यासाठी फेडरेशन ठामपणे सोसायटी धारकांच्या पाठीशी राहील.

**- संजीवन सांगळे,, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**